नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 04/09/2021 (शनिवार)
(सायंकाळ)

---

## केळवद येथील दाढेरा शिवारात सुरु असलेल्या अवैध मोहाफुल गावठी हातभट्टी दारूचे अड्डयावर पो.स्टे. केळवद आणि स्थानिक गुन्हे शाखेची संयुक्तरित्या केलेली कार्यवाही एकुण 6,74,300/- रू चा मुद्देमाल जप्त

दिनांक 03/09/2021 रोजी पोलिस स्टेशन केळवद अंतर्गत मौजा दाढेरा शिवार त. कळमेश्वर येथे अवैधरित्या मोहाफुल दारू गाळणाऱ्या आरोपीतांविरूद्ध दोन केसेस करण्यात आले. पो. स्टे. केळवदचे स्टाफ तसेच स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणचे पथक यांनी संयुक्तरित्या मुख्यबिरव्दारे मिळालेल्या खबरेवरून दाढेरा शिवारात पोहचले असता तेथे अवैधरित्या मोहाफुल गावळी दारूची भट्टी लावुन मोहाफुल गावठी दारू गाळणारे आरोपी क्र. 1. अमित चंद्रपाल राजपुत रा. तिडंगी याचे दाढेरा व 2. सुर्यपाल चंद्रपाल राजपुत, रा. पारधी बेडा तिडंगी तह. कळमेश्वर हे दाढेरा शिवारातील शेताला लागुन असलेल्या झुडपी जंगलात हातभट्टी लावुन दारू गाळतांना दिसले. यातील आरोपी हे पोलिसांना पाहुन जंगलाच्या दिशेने पळुन गेले. त्यांचा पाठलाग केला असता ते मिळुन आले नाही. घटनास्थळावरून दोन्ही प्रकरणात एकुण 5400 लिटर मोहाफुल रसायण (सडवा) कि. 5,40,000/-रू. 300 लिटर मोहाफुल गावठी दारू कि. 60,000/-रू. व मोहाफुल दारू गाळण्याचे साहित्य असा एकुण 6,74,300/- रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दोन्ही केसेस मध्ये आरोपीतांविरूध्द पो.स्टे केळवद येथे महाराष्ट्र दारूबंदी कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास सहायक फौजदार अमरदिप कामठे हे करित आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. राकेश ओला, अपर पोलिस अधीक्षक श्री राहुल माकणीकर, उपविभागिय पोलिस अधिकारी सावनेर श्री. अशोक सरंबळकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे मार्गदर्शनात ठाणेदार पोनि श्री राहुल सोनवणे, स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणचे पोलिस नाईक राजेन्द्र रेवतकर, आशिष मुंगळे, किशोर वानखेडे, मनापोशि नम्रता बघेल व पो. स्टे. केळवदचे पोलिस नाईक रविन्द्र चटप, पोशि धोंडुतात्या देवकते, श्रीधर कुलकर्णी सचिन येळकर चापोशि राहुल खरबडे यांनी केलेली आहे.





# अकस्मात मृत्यु

पो.स्टे. बोरी :– कु दिशा पुरूषोत्तम शर्मा(मृतक), वय 20 वर्ष रा.हजारी पहाड अनुश्क्ती नगर गिट्टीखदान नागपुर हि आपले वडिलासह दि. 27/08/2021 रोजी सकाळी 08.15 वा. सुमारास धामणगाव रेल्वे येथुन पुणे स्पेशल ट्रेन गाडीमध्ये तिकिट काढून नागपुरला येत असता मृतक हि ट्रेनचे शौचालयात जात असतांना अचानकपणे तोल जाउन दारातुन चालत्या ट्रेनमधुन खाली पडल्याने सेन्ट क्लारेन्ट शाळेजवळ बुटीबोरी येथे तिचे डोक्याला चेहऱ्याला, हाता, पायाला मार लागला. तिला उपचाराकरिता प्रथम माया हॉस्पिटल बुटीबोरी व नंतर नागपुर मेडिकल कॉलेज येथे दि 28/08/2021 चे 12.17 वा. भरती केले असता उपचारादरम्यान दि. 29/08/2021 चे 11.30 वा. मृत घोषित केले. सदरचे कागदपत्रे पो. स्टे. बोरीला प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक राजेश माकडे, मेडीकल पोलिस बुथ यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. बोरी येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक प्रविण देव्हारे मो.क्र. 9822394597 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर